

वाढदिवसाच्या शुभेच्छा ...!

• डॉ. दिनेश भोंडे	१ जानेवारी
• श्री. संतोष वसंत सोनार	१ जानेवारी
• श्री. राजाराम पाटील	४ जानेवारी
• श्री. विजयसिंह चंदेले	४ जानेवारी
• डॉ. रमेश शेकोकार	५ जानेवारी
• श्री. प्रकाश मानकर	५ जानेवारी
• श्री. विलास जगन्नाथ दशपुते	५ जानेवारी
• श्री. दत्तू एकनाथ वरंदळ	५ जानेवारी
• श्री. प्रदीप शंकरराव गायकवाड	६ जानेवारी
• डॉ. राजेंद्र वडनेरे	६ जानेवारी
• श्री. अनिल बाळकृष्ण निपळुंगे	१० जानेवारी
• श्री. हेमराज राजपूत	१४ जानेवारी
• श्री. पंकज शांताराम बोराडे	२१ जानेवारी
• श्री. श्रीनिवास खुर्द	२२ जानेवारी
• श्री. सुनील साळुंखे	२४ जानेवारी
• श्री. किशोर अमृतराव शिंदे	२५ जानेवारी
• श्री. माधव पळशीकर	२८ जानेवारी
• श्री. सुनील निकम	२९ जानेवारी

वाढदिवसाच्या शुभेच्छा ...!

• श्री. राजेंद्र त्र्यंबक हिरे	३ फेब्रुवारी
• वसंत दगू मोरे	३ फेब्रुवारी
• श्री. अभय मनोहर कुलकर्णी	६ फेब्रुवारी
• श्री. आनंद कमलाकर बर्वे	७ फेब्रुवारी
• श्रीमती सुवर्णा माधव चव्हाण	८ फेब्रुवारी
• श्री. सुदाम भागवत तळेले	१२ फेब्रुवारी
• श्री. विवेक गोविंदराव अहिरे	१५ फेब्रुवारी
• श्री. प्रवीण खंडेराव घोडेस्वार	१८ फेब्रुवारी
• श्री. राजेश हिरालाल आहेर	१९ फेब्रुवारी
• श्री. कैलास भट बोरसे	२२ फेब्रुवारी

राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांना विद्यापीठात अभिवादन



ज्ञानगंगोत्री : राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. या वेळी कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे व वित्त अधिकारी मगन पाटील यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. हिंदवी स्वराज्याची स्थापना करून शिवरायांनी नवे युग निर्माण केले. समाजासाठी जिजाऊंचे कार्य अनमोल आहे. चातुर्यसंपन्न जिजाऊंनी शिवरायांना घडविले. एक आदर्श माता म्हणून त्यांनी आपला आदर्श समाजापुढे ठेवला असल्याचेही डॉ. भोंडे यांनी सांगितले.

निवडणूक आयुक्त सहारिया यांचा विद्यापीठातर्फे सन्मान



ज्ञानगंगोत्री : राज्याचे निवडणूक आयुक्त जे. एस. सहारिया यांनी नुकतीच विद्यापीठास भेट दिली. या वेळी त्यांनी नाशिक, जळगाव आणि अहमदनगर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांशी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला. या बैठकीच्या समन्वयासाठी कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे यांची नियुक्ती करण्यात आली होती. याप्रसंगी निवडणूक आयुक्त श्री. सहारिया यांचा विद्यापीठातर्फे पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. विद्यापीठाच्या दृक-श्राव्य स्टुडिओत झालेल्या या बैठकीस आयोगाचे सचिव शेख चन्ने, विभागीय आयुक्त एकनाथ डवले, विशेष पोलीस महानिरीक्षक विनयकुमार चोबे, जिल्हाधिकारी बी. राधाकृष्णन, मनपा आयुक्त अभिषेक कृष्णा आदि उपस्थित होते.

'यशवार्ता'साठी आपले अनुभव, यश-अभिनंदनाच्या बातम्या पाठवा.
- संतोष साबळे,
कार्यकारी संपादक - यशवार्ता

संपादक : प्रा. डॉ. दिलीप म्हैसेकर, कुलगुरू, **कार्यकारी संपादक :** संतोष साबळे, **निर्मिती :** आनंद यादव, **सदस्य :** विवेक ओक, **छायाचित्रे :** राजेश बर्वे
मुद्रक व प्रकाशक : डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक - ४२२ २२२
मुद्रक : नरेंद्र शाळिग्राम, मे. रिप्लिका प्रिंटर्स, वकीलवाडी, नाशिक. **अक्षरजुळणी व मांडणी :** बाबा जाधव (खासगी वितरणासाठी)

ज्ञानगंगा घरोघरी
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
जानेवारी-फेब्रुवारी २०१७ अंक ४३
यशवार्ता



विद्यापीठात ६८वा प्रजासत्ताक दिन साजरा

ज्ञानगंगोत्री : भारताचा ६८वा प्रजासत्ताकदिन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र विद्यापीठात नुकताच साजरा करण्यात आला. कुलगुरू प्रा. डॉ. दिलीप म्हैसेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या वेळी कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे यांनी विद्यापीठ सहकाऱ्यांना प्रजासत्ताकदिनाच्या शुभेच्छा दिल्या. विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांचे संचालक, शिक्षक, अधिकारी, कर्मचारिवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पायाभूत शिक्षणाचा विकास साधण्याची नितांत गरज : कुलगुरू प्रा. डॉ. दिलीप म्हैसेकर



नांदेड : बदलत्या स्थितीत शैक्षणिक क्षेत्रात मोठे बदल होत आहेत. तंत्रज्ञानाची प्रगती, बहुमाध्यमांचा प्रभाव पाहता शिक्षण संस्थांसमोर आव्हाने ठाकली आहेत. त्यांचा सामना करण्यासाठी पायाभूत शिक्षणाचा विकास साधण्याची नितांत गरज आहे. व्यक्ती आणि समाजाचा विकास साधण्यासाठी मुक्त शिक्षण प्रणाली हे प्रभावी माध्यम आहे. शिक्षणाची समान संधी मिळवून देण्यासाठी मुक्त विद्यापीठाचे कार्य कौतुकास्पद असल्याचे सांगून, भविष्यात विद्यापीठाच्या यशाचा आलेख आणखी उंचावेल, असा विश्वास यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. दिलीप म्हैसेकर यांनी नांदेड येथे बोलताना व्यक्त केला.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या नांदेड विभागीय केंद्राच्या वतीने 'दूरशिक्षणात अभ्यासकेंद्रांची भूमिका' या विषयावर एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे, वित्त अधिकारी मगन पाटील, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचे संचालक डॉ. उमेश राजदेरकर, वाणिज्य विद्याशाखेचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश देशमुख, व नांदेड विभागीय केंद्राचे सहयोगी सल्लागार डॉ. डी. एल. जामगे पाटील, डॉ. अनिरुद्ध गावंडे, मुंबई विभागीय केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. प्रबोध चोबे, उत्तम जाधव उपस्थित होते. या वेळी नांदेड विभागीय केंद्राच्या वाटचालीचा मागोवा घेणाऱ्या 'प्रकाशवाटा' स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन डॉ. अजय गव्हाणे यांनी केले. सहायक कुलसचिव चंद्रकांत पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

विद्यापीठाचा २३वा दीक्षान्त समारंभ ७ फेब्रुवारीला



गानकोकिळा लता मंगेशकर यांना डी.लिट. पदवी प्रदान करणार

ज्ञानगंगोत्री : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा २३वा दीक्षान्त समारंभ ७ फेब्रुवारी २०१७ रोजी सायंकाळी ४ वाजता विद्यापीठ परिसरात संपन्न होणार आहे. 'ज्ञानगंगा घरोघरी' हे ब्रीद असलेल्या या विद्यापीठातर्फे यंदा १ लाख ४० हजार ४८४ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान केली जाणार आहे. विशेष म्हणजे या समारंभाचे औचित्य साधून संगीत क्षेत्रात जागतिक स्तरावर नावलौकिक मिळविलेल्या भारतरत्न गानकोकिळा लता मंगेशकर यांना विद्यापीठातर्फे डॉक्टरेट ऑफ लेटर्स (डी.लिट) पदवीने सन्मानित करण्यात येणार आहे.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सचे कुलपती व दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सचे प्र. कुलपती डॉ. वेदप्रकाश मिश्रा हे स्नातकांना प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. तर समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. दिलीप म्हैसेकर असतील.

नॅशनल गोवा बाईकिंग एक्सपीडिशन
एक अविस्मरणीय अनुभव





भटकंती

प्रमोद आर. जावळे
नेटवर्क इंजिनीअर, संगणक केंद्र

दि. ५ जानेवारी ते १२ जानेवारी २०१७ या कालावधीत घेण्यात आलेल्या नॅशनल बाईकिंग एक्सपीडिशन गोवा आणि युथ होस्टेल असोशिएशन ऑफ इंडिया यांच्या वतीने घेण्यात आली. यामध्ये संपूर्ण भारतातील एकूण २२ जणांनी सहभाग नोंदविला. साधारण २० ते ६२ वयोगटातील सहकारी. त्यात ५ मुलीही. त्या सर्वजणी अनुभवी व खेळाडू होत्या. गुजरात, कर्नाटक, राजस्थान आणि महाराष्ट्र (मुंबई, पुणे, कोल्हापूर, नाशिक) या विविध भागांमधून सहभागी झाले होते. नाशिकमधून मी स्वतः आणि छत्रपती पुरस्कार विजेता व्हॉलीबॉल खेळाडू राजेश गायकवाड व सानिका गायकवाड असा आमचा २२ जणांचा चमू.

पहिल्या दिवशी बायकिंग ट्रायल घेण्यात आली. यामध्ये ३ ते ३.५ कि.मी. अवघड घाटरस्ता पार करण्यास सांगितले. उत्साहात हे किरकोळ अंतर पार केले. सर्व जण एकत्र आल्यानंतर सांगण्यात आले की, अशा ४ फेऱ्या न थांबता पूर्ण करायच्या आहेत. यामध्ये ३ जणांनी जागीच माघार घेतली आणि मग राहिलेल्या १९ जणांनी बाईकिंग एक्सपीडिशन पूर्ण केले. पहिल्या दिवशीच तुम्ही सर्व जण गोवा फिरण्यासाठी किंवा सहलीसाठी नव्हे तर बाईकिंग एक्सपीडिशनसाठी आल्याचे सांगण्यात आले.

रोजचा दिवस पहाटे ५ वाजता सुरू झाल्यावर सर्व तयारी ब्रेकफास्ट व सोबत लंच पॅक घेऊन सकाळी ७ ते ७.१५ वा. पुढील मार्गावर जाण्यासाठी सज्ज व्हावे लागत. एकंदर बाईकिंग एक्सपीडिशनच्या कार्यक्रमात पहिल्या दिवशी कंपाल, पणजी येथे बेस कॅम्पमध्ये नाव नोंदणी, ओळख परेड व रात्री कॅम्प फायर व रूपरेषा. दुसऱ्या दिवशी सायकल टेस्ट ३-३.५ कि.मी. घाट ४ वेळेस, संध्याकाळी सिटी राईड १५ कि.मी. कंपाल ते डोनापावला बीच. तिसऱ्या दिवशी पणजी- मिरामार बीच ते डोनापावला बीच सायकल व तेथून वास्को फिशिंग जेट्टीपर्यंत मोटारबोट सायकलसहीत. तेथून पुढे एअरपोर्ट रोड, कॅनासुलेम बीच ते मोबोर बिच एकूण २६ कि.मी. बीच रोड व मुक्काम असोलना गाव, असा तब्बल ४७ कि.मी.चा प्रवास.

चौथ्या दिवशी असोलना गाव ते बांदा, कुनीकोलेम, बल्ली, आदनेम, कारवेम ते नेत्रावली फॉरेस्ट व ३-३.५ कि.मी. नेत्रवली धबधबा जंगल ट्रॅकचे ४८ कि.मी.चे अंतर पार केले.

पाचव्या दिवशी जंगल ते बुलबुला तालाब, कुर्दी, विलेम, भाटी, उगेम चर्च, टिबंलो ते काले रेल्वेगेट, कोलेम, सावरगल हा ४४ कि.मी.चा पल्ला कापला. सहाव्या दिवशी सावरगल ते काले, कोलेम, मोलेम सतपाल, बोंडला आर्क, बोंडला नॅशनल पार्क, उसगाव, खांडेपार (सर्वात अवघड व कस लावणारा कच्चा व दगड गोट्यांचा घाटरोड), एकूण ५८ कि.मी. अंतर पार केले. सातव्या दिवशी खांडेपार, ओपा, बेतकी, ओल्ड गोवा, बेस कॅम्प कंपाल, पणजीचा ३८ कि.मी. प्रवास पूर्ण करून पारितोषिक वितरण व कॅम्प फायरने सांगता झाली.

या एक्सपीडिशन मोहिमेत एकूण २३५ कि.मी. अंतर पार करावयाचे होते. ज्यामध्ये बोंडला नॅशनल पार्क, नेत्रावली बर्ड सँचुरी, नेत्रावली धबधबा यासाठी ३-३.५ कि.मी.चा अवघड ट्रॅक तसेच २६ कि.मी.चा सागरी किनारा व अंतर्गत गोवा यामध्ये पूर्ण घाट सेक्शन, नॉर्थ गोवा साऊथ गोवा याचा समावेश होता.

विद्यापीठातील सर्व सहकाऱ्यांनीसुद्धा अशा प्रकारच्या मोहिमेमध्ये सहभागी होऊन, निसर्गाच्या सान्निध्यात राहाण्याचा प्रयत्न करावा. पर्यावरणातील प्रदूषण रोखण्यासाठी व शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त राहण्यासाठी सायकल चालविणे अतिशय महत्त्वाचे आहे. हा प्रवास करत असताना आमच्या चमूने एक महत्त्वाचा संदेशही दिला आहे तो म्हणजे ग्लोबल वॉर्मिंग आणि पर्यावरण संवर्धन. पेट्रोल जाळण्याऐवजी शरीरात नकोशी असलेली चरबी जाळा, सायकल चालवा आणि तंदुरुस्त रहा. असेच मी यानिमित्ताने सांगेन.!

अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचा विद्यापीठातर्फे सन्मान



ज्ञानगंगोत्री : राज्याचे अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार वनविभागाच्या कार्यक्रमासाठी आले असता त्यांनी विद्यापीठास सदिच्छा भेट दिली. या वेळी मुक्त विद्यापीठाच्या वतीने त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. या वेळी वित्त अधिकारी मगन पाटील, उपकुलसचिव सुनील बर्वे आणि जनसंपर्क अधिकारी संतोष साबळे आदी उपस्थित होते.

प्रवीण दीक्षित यांचा वाढदिवस साजरा



ज्ञानगंगोत्री : विद्यापीठातील कर्मचारी प्रवीण दीक्षित यांचा वाढदिवस मोठ्या उत्सहात साजर करण्यात आला. या वेळी एस.सी., एस.टी. कर्मचारी संघटनेचे व सीटू संघटनेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

विद्यापीठात सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी



ज्ञानगंगोत्री : आझाद हिंद सेनेचे संस्थापक, अध्यक्ष नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती विद्यापीठात नुकतीच साजरी करण्यात आली. या वेळी वित्त अधिकारी मगन पाटील यांनी नेताजी बोस यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमास विद्यापीठाच्या विविध विभागातील अधिकारी, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यश | निवड | अभिनंदन

चंद्रकांत पवार पेट परीक्षा उत्तीर्ण



नांदेड : विद्यापीठाच्या नांदेड विभागीय केंद्र कार्यालयात कार्यरत असलेले सहायक कुलसचिव चंद्रकांत पवार यांनी स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या पेट परीक्षेत यश संपादन केले आहे.

या परीक्षेत समाजशास्त्र विषयात अवघे चार विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यात श्री. पवार यांचा समावेश आहे. त्यांच्या या यशाबद्दल कुलगुरू प्रा. डॉ. दिलीप म्हैसेकर, कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे यांच्यासह विद्यापीठ परिवारातर्फे अभिनंदन करण्यात आले आहे.

अनिहा घोडेस्वारचे दुहेरी यश



नाशिक : विद्यापीठाच्या मानव्यविद्या आणि सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतील प्रा. प्रवीण घोडेस्वार यांची सुकन्या कु. अनिहा हिने दैनिक महाराष्ट्र टाइम्सने बालदिनानिमित्ताने आयोजित केलेल्या कथालेखन स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. अभिनेते संदीप कुलकर्णी यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. नाशिक येथील 'दिल्ली पब्लिक स्कूल'च्या वतीने अलीकडेच आंतरशालेय स्पर्धांचे आयोजन केले होते. या स्पर्धेत अनिहाने इंग्रजी निबंध लेखन स्पर्धेतही पहिला क्रमांक प्राप्त केला. ती विस्डम इंटरनॅशनल स्कूलमध्ये इ. चौथीमध्ये शिक्षण घेत आहे. तिच्या या दुहेरी यशाबद्दल 'यशवार्ता' परिवारातर्फे अभिनंदन.

पारस बर्वेचे ॲबॅकस परीक्षेत यश



नाशिकरोड : विद्यापीठाच्या कृषिविज्ञान विद्याशाखेत कार्यरत असलेले राजेश बर्वे यांचे चिरंजीव पारस बर्वे याने राज्यस्तरीय ॲबॅकसच्या द्वितीय परीक्षेत विशेष प्रावीण्य मिळविले. पारस हा के. एन. केला हायस्कूलमध्ये इ. ५वीत शिक्षण घेत आहे. या परीक्षेसाठी त्याला ब्लॉसम ॲकॅडमीच्या शिक्षकवृंदाचे विशेष मार्गदर्शन लाभले. पारस याचे 'यशवार्ता' परिवारातर्फे अभिनंदन.

डॉ. ऋचा गुजर यांचा संशोधन पेपर 'युके'त



नाशिक : युनायटेड किंग्डम (लंडन) येथे नुकत्याच पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय शैक्षणिक परिषदेत विद्यापीठातील निरंतर शिक्षण विद्याशाखेतील सहायक प्रा. डॉ. ऋचा गुजर यांनी संशोधन पेपर सादर केला. या परिषदेत जगभरातील प्राध्यापक उपस्थित होते. डॉ. गुजर यांचे विद्यापीठ परिवारातर्फे अभिनंदन.